स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विज्ञान विद्याशाखे अंतर्गत अर्थशास्त्र विषयात
विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी
सादर करण्यात आलेला

संशोधन आराखडा

''आयुष्यमान भारत योजनेचा किनवट तालुक्यातील आदिवासी समाजावरील आर्थिक सामाजिक परिणाम : एक चिकित्सक अभ्यास ''

''Social and Economic Impact of Ayushman Bharat Yojana on Tribal Community in Kinwat Taluka: A Critical Study''

संशोधक
प्रतिमा दादाराव वाढवे

मार्गदर्शक
प्रा. डॉ. पाटील पी. आर.
संशोधन मार्गदर्शक व अर्थशास्त्र विभागप्रमुख,
श्री. योगानंद स्वामी कला महाविद्यालय,
बसमत, जि. हिंगोली.

डिसेंबर – २०२४

''आयुष्यमान भारत योजनेचा किनवट तालुक्यातील आदिवासी समाजावरील आर्थिक सामाजिक परिणाम : एक चिकित्सक अभ्यास ''

''Social and Economic Impact of Ayushman Bharat Yojana on Tribal Community in Kinwat Taluka: A Critical Study''

प्रस्तावना :(Introduction)

भारताला स्वातंत्र्य होवून पंच्याहत्तर वर्ष पूर्ण झाली. तरी पण भारतातील सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व आरोग्यविषयक समस्या सुटलेल्या नाहीत. त्यात देशातील आदिवासी समाजाच्या समस्या ह्या फारच गुंतागुंतीच्या असून त्यांचे स्वरुपही गंभीर आहे. अलीकडच्या काळात "लोककल्याणकारी राज्य" ही संकल्पना समोर येत असल्याने शासनाने याकडे विशेष लक्ष दिले आहे. त्यामुळे शासन राज्यातील लोकांसाठी अनेक नवनविन लोककल्याणकारी योजना निर्माण करून त्या अमंलात आणण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यामधीलच एक आयुष्यमान भारत योजना होय. सदरील योजनेचा मुख्य उद्देश राज्यातील सर्वसामान्य समाजघटकाला आरोग्यविषयक समस्यांसाठी विमा संरक्षणाखाली आर्थिक मदत करून त्यांना सामाजिक विकासाच्या प्रवाहामध्ये आणणे हा आहे. या योजनेची व्याप्ती ग्रामीण व शहरी असल्याने आणि उत्पन्नाची मर्यादाही अधिक असल्यामुळे या योजनेमध्ये बऱ्याच समाजघटकांचा समावेश होतो. या योजनेमुळे समाजातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत लोकांचा सामाजिक व आर्थिक विकास झालेला आहे. त्यामुळे आयुष्यमान भारत योजना ही सर्वसामान्य लोकांच्या जीवनामध्ये मैलाचा दगड ठरू पाहत आहे. सदरील आयुष्यमान भारत योजना आदिवासी समाज व विशेषत: किनवट तालुक्यातील दुर्गम डोंगराळ भागात काही प्रमाणात यशस्वी ठरली आहे.

आयुष्यमान भारत योजना यशस्वी करण्यासाठी प्रशासनाची भुमिका महत्त्वपुर्ण आहे. आदिवासी समाजामध्ये शिक्षण, आरोग्य या बाबींकडे बघण्याची उदासिनता आहे. धार्मिकता व निसर्ग पध्दतीवर अत्याधिक विश्वास अशा या गुंतागुंतीच्या

परिस्थीतीमध्ये सदरील योजना आदिवासी समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविणे ही खरी प्रशासना समोरील समस्या आहे. प्रशासनाने आयुष्यमान भारत ही योजना व्यवस्थित हाताळली तर निश्चीतच आदिवासी समाजाचे आर्थिक, सामाजिक कल्याण साधले जाईल.

आयुष्यमान भारत योजनेचे स्वरुप : (The Nature of Ayushman Bharat Scheme)

आयुष्यमान भारत योजनेचा शुभारंभ २३ सप्टेंबर २०१८ रोजी झारखंडची राजधानी रांची येथे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाला. या योजनेअंतर्गत सरकारी आणि खाजगी आरोग्य केंद्रामध्ये प्रत्येक कुटुंबाला प्रति वर्ष पाच लाख रुपये शारीरिक बिमारी साठी विमा लाभ दिला जातो. सदरील योजना गरीब कुटुंबासाठी वरदान ठरली आहे. केंद्र व राज्य सरकारे ६० : ४० टक्के वाटा सदरील योजनेवर खर्च केला जातो. सरकारने ५० कोटी लोकांना लाभ देण्याचे उद्दिष्टे या योजनेअंतर्गत देण्याचे ठरविले आहे. आजपर्यंत या योजनेअंतर्गत १० कोटी लोकांना लाभ देण्यात आला आहे. या योजनेच्या धर्तीवर प्रत्येक घटकराज्यांनी वेगवेगळ्या योजना निर्माण केल्या आहेत.

संशोधन साहित्याचा आढावा :(Review of Research Literature)

मागील साहित्याचा आढावा पध्दतशीर संशोधनासाठी फार मोलाचा ठरतो मागील संशोधनानुसार संशोधकाच्या संशोधनाला दिशा मिळते. पुर्वी कशा पध्दतीने समस्या हाताळल्या तिचे स्वरुप कसे होते. समारोप काय झाला. निष्कर्ष काय निघाले काय उणिवा राहिल्या हे कळते. पूर्वीचे संशोधन हे विविध परिस्थितीत केलेले असते. तरीही ते ज्ञान प्रकल्प पध्दती व संशोधन विश्लेषणासाठी आवश्यक ठरते.

१. पालपवाड शेषराव सयाजी (२०१८) :

“नांदेड जिल्हयातील आदिवासींचा तालुकानिहाय मानव विकास निर्देशांक - एक अभ्यास” संशोधकाने सदरील अप्रकाशित शोधप्रबंधामध्ये नांदेड जिल्हयातील आदिवासी गावामध्ये आरोग्य सेवा पुरविण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्राची सोय ९६

टक्के गावामध्ये उपलब्ध नसल्याचे नमुद केले आहे. आदिवासी समाज हा मागास अंधश्रध्दा आणि निरक्षर असल्यामुळे तब्येत बिघडल्यानंतर ते आरोग्य केंद्राकडे न जाता मांत्रीक, भक्ताकडे जातात. आदिवासी भागामध्ये खाजगी दवाखान्याचे प्रमाण अतिशय कमी असल्याने आणि त्यांचा हेतू अधिक नफा कमविणे असल्याने ते या भागात साध्य होत नाही. तसेच मागास भागात उच्च शिक्षित डॉक्टर उपलब्ध होत नाहीत किंवा त्यांची इच्छा नसते. शासकीय आरोग्य केंद्रामध्ये त्यांची इच्छा नसते. शासकीय आरोग्य केंद्रामध्ये प्रशिक्षित मनुष्यबळ व तंत्रज्ञानाचा अभाव दिसून येतो अशा आशयाचा निष्कर्ष काढला आहे.

२. प्रविणकुमार किसनराव सावंत (२०१८) :

"ग्रामीण भागातील कुटुंबाचा आरोग्यावर होणारा खर्च विशेष संदर्भ - नांदेड जिल्हा" प्रस्तुत शोधप्रबंधामध्ये संशोधकाने ग्रामीण भागामध्ये होणारा आरोग्यावरील खर्च हा अतिशय अल्प असून तसेच आरोग्य सेवाचा अभाव असल्याचा निष्कर्ष काढला आहे. नांदेड जिल्हा हा प्रामुख्याने आदिवासी समाजाचा जिल्हा म्हणून ओळखला जातो त्यामुळे आदिवासी समाजाच्या आरोग्यावर होणारा खर्च हा अत्यल्प असल्याने व अतिशय दुर्गम भागात शासकीय व खाजगी आरोग्य केंद्र याचा अभाव असल्यामुळे मृत्यूचे प्रमाण जास्त असल्याचे म्हटले आहे.

४. काळे पांडुरंगराव संजय (२०१०) :

"महाराष्ट्रातील आदिवासी समाजाची लोकसंख्या विषयक काही वैशिष्टे" संशोधकांनी सदर शोधप्रबंधामध्ये आदिवासी समाजातील जावी व त्या समाजाची सामाजिक, सांस्कृतिक वैशिष्ट्ये सांगितले आहेत. त्याच बरोबर आदिवासी समाजातील दारिद्रय, शिक्षण अंधश्रध्दा ईत्यादी बाबीवर प्रकाश टाकण्याला प्रयत्न केलेला आहे.

५. देशमुख सुदर्शन कोंडबाराव (२०१९) :

“आदिवासी खेड्यातील दारिद्रय किनवट तालुका नमुना अभ्यास” सदर शोधनिबंधात लेखकाने आदिवासी खेड्यातील पायाभूत सुविधाचा अभाव त्याचबरोबर दारिद्रय, निरक्षरता धार्मिकता या बाबीमुळे त्यांच्या जीवनमानात सुधारणाचा अभाव असल्याचे आपल्या संशोधनात निष्कर्ष म्हणून काढले आहेत आणि उपाय योजना म्हणून आरोग्य, शिक्षण आणि पायाभूत सुविधा अधिक प्रमाणात पुरविण्याची सिफारस केली आहे.

६. तेगमपुरे मारोती विरभद्र (२०१२) :

"किनवट तालुक्यातील आदिवासी उपयोजनेचे मुल्यमापन" अप्रकाशित शोधप्रबंध डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद प्रस्तुत शोध प्रबंधामध्ये संशोधकाने किनवट तालुक्यात आरोग्य सेवांचा फार मोठ्या प्रमाणात अभाव असल्याचे म्हटले आहे. किनवट तालुक्यातील आदिवासी समाजाचे जीवनमान उंचावण्यासाठी शासनाने विशेष लक्ष देण्याची शिफारस केली आहे.

७. मुणगेकर भालचंद्र (२००६) :

“आर्थिक विकास व सामाजिक न्याय, लोकराज्य मासिक” महाराष्ट्र शासन प्रकाशित या संदर्भात योजना आयोगाचे सदस्य भालचंद्र मुणगेकर यांनी असे मत व्यक्त केले की, अनुसुचित जाती आणि जमातीचे लोक विशेषत: ग्रामीण भागात राहणारे पूर्वग्रह आणि भेदभाव- पुर्ण दृष्टिकोणामुळे सर्व प्रकारच्या समस्याना सामोरं जात आहेत.साक्षरता रोजगार, आरोग्य, स्वच्छता, सरासरी आयुर्मान, घरे इत्यादी बाबतीत अनूसउचइत जाती, जमाती समाज घटकांचा विचार करता उर्वरित देशवासियांपेक्षा फारच मागे पडले आहेत असा निष्कर्ष काढला आहे. म्हणून शासनाने आदिवासी समाजाच्या आरोग्याकडे विशेष लक्ष पुरविणे गरजेचे आहे.

८. कोकाटे चंद्रकांत नामदेवराव (२००८) :

"हिंगोली जिल्हयातील आदिवासी समाजाचे आर्थिक व सामाजिक अध्ययन" या शोधप्रबंधामध्ये संशोधकाने आदिवासी समाजाच्या किती लोकांना लाभ विविध शासकीय योजनेचा मिळाला या संदर्भात सर्वेक्षण केले असता निराशाच हाती आली असल्याचे नमुद केले आहे.

९. भगाडे पोपट मच्छिंद्र (२०१२) :

"ठाणे जिल्हयातील आदिवासी समाजाचे आर्थिक व सामाजिक स्थितीचे अध्ययन" सदर शोध प्रबंधामध्ये संशोधकाने आदिवासी समाजाचे सामाजिक व आर्थिक दृष्टीकोणातून अध्ययन केले आहे यामध्ये त्यांनी आदिवासी समाजाची सामाजिक स्थिती सुधारण्यासाठी शिक्षण, आरोग्य व रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याची आणि त्यांना सामाजिक विकासाच्या प्रवाहामध्ये आणण्याचा प्रयत्न करावा. अशी शिफारस केली आहे.

१०. अंभोरे विजयकुमार दगडूजी (२०१६) :

"Socio Economic Approach of National Rural health mission in Maharashtra (NRHM) a study" सदर शोधप्रबंधामध्ये संशोधकाने महाराष्ट्रातील ग्रामीण आरोग्य सेवेचा सामाजिक व आर्थिक दृष्टिकोनातून अभ्यास केला असून सदर प्रबंधामध्ये आरोग्य व्यवस्था सक्षम करण्यासाठी सरकारने कृति करण्याचे व लोकांना आरोग्य सुविधा पुरविण्याची शिफारस केलेली आहे.

संशोधनाचे महत्त्व :(Importance of Research)

अलीकडच्या काळात 'Health is Wealth' हि संकल्पना समोर येत आहे. वातावरणातील बदलामुळे विविध आजार होत आहेत. मानवी जीवन धावपळीचे बनले आहे. फास्टफुड, जंगफुड व्यसनाधिनता, ताणतणाव भविष्याची अत्याधिक काळजी यामुळे मानवी जिवनावर गंभीर परिणाम दिसून येत आहेत. त्यामुळे अशा

लोकांचे आरोग्य केंद्रात पैशाअभावी मृत्यू होत आहेत. दुरंधर आजारावर लाखो रुपये खर्च येत असल्यामुळे कुटुंबातील व्यक्तींचा पैशाअभावी आपल्या डोळ्यासमोर मृत्यू बघून हतबल झाले आहे. अशा परिस्थितीत नवनविन जिवन विमा कंपनी वार्षिक प्रिमीयमवर संरक्षण देत आहेत. यासाठी ठराविक पॉलिसीचा वार्षिक खर्च करावा लागतो. हा खर्च फक्त सदन कुटूंबातील व्यक्ती करु शकतात परंतू गरीब आदिवासी समाजातील लोकांना हा खर्च परवडण्यासारखा नाही. त्यामुळे केंद्र सरकारने २३ सप्टेंबर २०१८ रोजी आयुष्यमान भारत योजना सुरु करण्यात आली. सदर योजनेचा उद्देश गरिब कुटुंबातील आजारी व्यक्तीला पाच लाख रुपये उपचारावर खर्च करण्यासाठी दिला जातो. सदर योजनेचा उद्देश आदिवासी समाजाच्या विशेषत: दुर्गम किनवट तालुक्यातील लोकांच्या परिप्रेक्ष्यात सफल झाली की नाही त्या दृष्टीकोनातून अभ्यास करण्याचा असल्याने तो महत्त्वपुर्ण आहे.

संशोधनाची उदिष्टे : (Objective of Research)

प्रस्तुत संशोधनाची पुढील उद्दिष्टे आहेत.

१. आयुष्यमान भारत योजनेमुळे आदिवासी समाजाच्या आर्थिक, सामाजिक जीवनामध्ये झालेला बदल अभ्यासणे.

२. प्रशासनाची आयुष्यमान भारत योजनेची अंमलबजावणीतील भूमिका अभ्यासणे.

३. आयुष्यमान भारत योजनेची सद्यस्थितील उपयुक्तता अभ्यासणे.

संशोधनाची गृहीतके :(Hypothesis of Research)

सामाजिक संशोधनामध्ये गृहीतकृत्याचे विशेष महत्त्व आहे. गृहीतकृत्ये हे संशोधनात संशोधकांना मार्गदर्शन करीत असतात. संशोधनात वैज्ञानिक पध्दतीने एखाद्या विषयाचे अध्ययन करायचे असल्यास प्रथम त्या विषयासंदर्भात पूर्व ज्ञान असावे लागते. या पूर्व ज्ञानाच्या आधारे संशोधक सामान्य अनुमान काढतो. त्या अनुमानास गृहीतकृत्ये असे म्हणतात. ती पुढीलप्रमाणे

१. आयुष्यमान भारत योजना किनवट तालुक्यातील आदिवासी समाजाच्या सामाजिक, आर्थिक बाबतीत यशस्वी होऊ शकते.

२. आयुष्यमान भारत योजनेची अंमलबजावणी करण्यास प्रशासनाला अडचणीचा सामना करावा लागतो.

३. आयुष्यमान भारत योजनेमुळे आदिवासी समाजातील आरोग्यासंबंधीच्या समस्यामध्ये बदल होऊ शकतो.

संशोधन पध्दती : (Research Method)

प्रस्तुत संशोधनासाठी अन्वेषणात्मक, विश्लेषणात्मक, वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात येणार आहे. तसेच सांख्यिकीय पध्दतीचा संकलित केलेल्या माहितीवर प्रक्रिया करण्यासाठी वापर करण्यात येणार आहे.

नमुना निवड :(Sampling selection)

प्रस्तुत संशोधनामध्ये नमुना निवडीच्या प्रकारात गैर संभाव्यता नमुना निवड अंतर्गत सहहेतूक नमुना निवड पध्दतीचा वापर करण्यात येणार आहे. किनवट तालुका हा नांदेड जिल्हयातील इतर तालुक्यापेक्षा सर्वार्थाने वेगळा असून नांदेड शहरापासून १३८ किमी अंतरावर वसलेल्या या तालुक्यात १९१ गावाचा समावेश असून बहुतांशी सर्वच गावात आदिवासी समाजाचे वास्तव्य पहावयास मिळते. तालुक्यातील १९१ गावांपैकी प्राधान्याने लोकसंख्या जास्त असलेल्या २५ गावात प्रत्यक्ष भेटी देवून प्रत्येक गावातील १० कुटुंब प्रमुखांची म्हणजेच एकूण २५० व्यक्तींची मुलाखत व अनुसुचीचा आधार घेऊन त्यांच्याकडून समस्यांची माहिती घेण्यात येईल.

तथ्य संकलन :(Data collection)

प्राथमिक स्त्रोत : (Primary Source)

"आयुष्यमान भारत योजनेचा किनवट तालुक्यातील आदिवासी समाजावरील आर्थिक सामाजिक परिणाम : एक चिकित्सक अभ्यास''प्रस्तुत संशोधनाचा विषय असल्यामुळे प्रत्यक्ष अभ्यास महत्त्वाचा आहे. त्यामुळे तथ्य संकलनासाठी प्राथमिक

स्त्रोताच्या माध्यमातून मुलाखत, प्रश्नावली, अनुसूची तंत्राचा वापर करण्याचे ठरविले आहे.

दुय्यम स्त्रोत : (Secondary Sources)

"प्रस्तुत संशोधनात द्वितीय स्त्रोताअंतर्गत अध्ययन विषयासंबंधित असणारी शासकीय अहवाल, संदर्भग्रंथ, प्रकाशित-अप्रकाशित लघुशोध प्रबंध, शोधप्रबंध, वर्तमानपत्रे, मासिके, इंटरनेट इत्यादी बाबींचा तथ्य संकलन करण्यासाठी उपयोग करण्यात येईल.

तथ्य विश्लेषण :(Analysis of Data)

संशोधक वेगवेगळया तथ्याच्या आधारे तथ्य संकलन करतो. अशा विश्लेषणाच्या आधारे गुणात्मक तथ्याचे सांख्यिकीय व वस्तुनिष्ठ तथ्यांत रुपांतर केले जाते व विश्लेषणानंतर निष्कर्ष काढले जातात. प्रस्तुत संशोधनात तथ्यांचे संकलन करण्यासाठी तथ्याच्या गुणधर्मानुसार विभाजन करण्यात येईल. अशा विश्लेषणाशिवाय तथ्याला अर्थपुर्णता प्राप्त होणार नाही. म्हणून प्रस्तुत संशोधनात आशय विश्लेषणाचा उपयोग केला जाईल.

संशोधनाची व्याप्ती : (scope of Research)

प्रस्तुत संशोधनाचे क्षेत्र हे किनवट तालुक्यापुरतेच मर्यादीत आहे. यात आयुष्यमान भारत योजनेचा किनवट तालुक्यातील आदिवासी समाजावरील आर्थिक सामाजिक परिणामांचा अभ्यास करण्यात येईल. सदर अभ्यासातून निघालेले निष्कर्ष हे केवळ किनवट तालुक्यास लागु असतील.

अभ्यास क्षेत्र :(Area of Study)

प्रस्तुत संशोधन प्रबंधासाठी किनवट तालुक्याची निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्यातील मराठवाडा विभागातील नांदेड हा शेवटचा जिल्हा आणि किनवट हा जिल्हयातील शेवटचा अतिदुर्गम तालुका आहे. किनवट तालुका हा नांदेड

जिल्ह्यातील इतर तालुक्यापेक्षा सर्वार्थाने वेगळा असून नांदेड शहरापासून १३८ किलोमीटर अंतरावर वसलेला आहे. तालुक्याचे एकुण भौगोलिक क्षेत्रफळ २०१२३५ कि. मी. इतके आहे. आदिवासी समाज हा या जंगल व डोंगराळ प्रदेशात राहत असल्याने त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामध्ये वाहतुकीची समस्या, पिण्याचे पाणी, वैद्यकीय सोयी-सुविधा, हवेशीर घरे, शिक्षण इत्यादी होत.

किनवट तालुक्यात १९१ गावाचा समावेश असून तालुक्यात गोंड, आंध, परधान, भिल्ल आणि कोलाम आदिवासी जमाती वास्तव्य करतात. त्यांच्यावर आयुष्यमान भारत योजनेचा आर्थिक व सामाजिक प्रभाव कितपत पडला. याचा अभ्यास केला जाईल. सदरील संशोधन सरकारला येणाऱ्या काळात विविध योजना निर्मिती करण्याकरिता दिशादर्शक ठरेल.

प्रकरण रूपरेषा : (chapter scheme)

१. प्रस्तावना व संशोधन पध्दती

२. किनवट तालुक्याची वैशिष्ट्ये

३. आयुष्यमान भारत योजनेची सद्य:स्थिती -किनवट तालुका

४. तथ्य संकलन व विश्लेषण

५. निष्कर्ष व शिफारशी

संदर्भ सूची : (Reference)

१. आगलावे प्रदिप (२०१०), "सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे", श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

२. गारे गोविंद, (१९९४), "आदिवासी प्रश्न आणि परिवर्तन", अमृत प्रकाशन, औरंगाबाद.

३. कुलकर्णी शरद, (२०००), "महाराष्ट्रातील आदिवासी" आपटे प्रभा (संपा.) वनवासी विकास – संकल्पना आणि दिशा, वनवासी कल्याण केंद्र, मुंबई.

४. चौधरी उद्धव, (१९९०), "महाराष्ट्रातील आदिवासींचे सामाजिक व आर्थिक जीवन", आदिवासी संशोधन पत्रिका, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.

५. नाडगोंडे गुरूनाथ, (१९७९), "भारतीय आदिवासी", कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे.

६. राजन अमिताभ, (संपा.), (१९८५), "स्थानिक इतिहास आणि साहित्य : एक शोध नांदेड", महाराष्ट्र राज्य रौप्य महोत्सवी वर्ष.

७. गावित माणिकराव (१९८५) महाराष्ट्र आदिवासी दर्शन, महाराष्ट्र राज्य आदिवासी सहकारी विकास मंडळ, नाशिक

८. गोरे-गोविंद (१९९८), (संकलन व संपादन) आदिवासी विकास योजना, आदिवासी विकास प्रतिष्ठान पुणे.

९. बुरंगे राजेश (२०१०), आदिवासी क्षेत्राचा आरोग्य दर्जा काय? पब्लीकेशन हनुमान नगर, नागपुर

१०. देशमुख सुदर्शन, (२००४) "आदिवासी खेड्यातील दारिद्य" (अप्रकाशित शोधप्रबंध) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

११. Bose Nirmal Kumar (2002), Tribal Life in India, National Book Trust India, Delhi.

१२. Govt. of Maharashtra (2000) “Tribal Development department Socio-Economic information of tribals in tribal Area of Maharashtra State, T.R.T.I. Pune

१३. Govt. of India, (1989) 1990, The Report of the commissioner for Scheduled Castes and Secheduled Tribes Twenty Ninth Report, New Delhi.

१४. Jain Navinchandra, (1998), “Tribal in Maharashtra State in Vidyut Joshi (Ed.) Tribal Situation in India Issues in Development” Rawal Publication, Jaipur.

१५. Kulkarni M.G., (1974), “Problems of Tribal Development – A Case Study”, Parimal Prakashan, Aurangabad.

१६. www.nrhm.gov.in

१७. www.ayushmanbharat.gov.in

संशोधक

प्रतिमा दादाराव वाढवे

मार्गदर्शक

प्रा. डॉ. पाटील पी. आर.
संशोधन मार्गदर्शक व अर्थशास्त्र विभागप्रमुख,
श्री. योगानंद स्वामी कला महाविद्यालय,
बसमत, जि. हिंगोली.